नगरपरिषद प्रशासन संचालनालय
७वा मजला, बेलापूर भवन, नवी मुंबई महानगरपालिका इमारत,
सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

आदेश क्र.नपप्रसं २०२५/ मुलभूत सोयी सुविधा अनुदान /कक्ष-७/9480 दिनांक- 15 DEC 2025

वाचा:-
(१) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग -४)/नवि-१६ दिनांक :-२९ मार्च, २०२५.
(२) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग -२)/नवि-१६ दिनांक :-४ एप्रिल, २०२५.
(३) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक:-मनपा-२०२५/प्र.क्र. १८५(१)/नवि-१६ (ई-१२७७९०६) दिनांक :-२४ नोव्हेंबर,२०२५.

**राज्यातील महानगरपालिका यांना सन २०२४-२०२५ साठी निधी वितरीत करण्याबाबत "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास" योजनेअंतर्गत लेखाशीर्ष(२२१७०९१३) रक्कम रु.६५,००,०००/- (रक्कम रु.पासष्ट लाख फक्त) निधी वितरण आदेश क्र.१०.**

वाचामधील क्र. १ व २ मधील शासन निर्णय, नगर विकास विभाग अन्वये सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास या योजनेअंतर्गत राज्यातील महानगरपालिकांना शासनाने वेळोवेळी आदेशीत केल्यानुसार निधी वितरीत करण्याकरिता संचालनालयास निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

उपरोक्त वाचामधील क्र.३ च्या शासन निर्णयान्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास या योजनेखाली लेखार्शीर्ष (२२१७०९१३) अंतर्गत महानगरपालिका यांना **रक्कम रु.६५,००,०००/-(रक्कम रु.पासष्ट लाख फक्त)** इतका निधी वितरीत करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर निधी हा वित्त विभाग ,शासन निर्णय क्रमांक :-संकीर्ण -१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय,दिनांक ६ जून,२००८ मधील तरतुदी प्रमाणे खर्च करणे बंधकारक राहीलअसे संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केले आहे त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

सोबत नमूद करण्यात आलेल्या विवरण पत्रातील **परिशिष्ट अ** मध्ये नमूद करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी/जिल्हा नियोजन अधिकारी /जिल्हा प्रशासन अधिकारी (संबधित), जिल्हाधिकारी कार्यालय यांना नगर विकास विभाग नवि-१६ कडील शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्याचे आदेशीत केलेनुसार संबधितांनी कळविलेल्या त्यांच्या बँक खातेवर निधी वितरीत करण्यात येत आहे.

| |
|---|
| **आदेश क्र.१०** |
| **परिशिष्ट - अ** |
| **महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजना लेखाशीर्ष (२२१७०९१३) अंतर्गत सन २०२४-२०२५ साठी निधी वितरण** |

| अ.क्र. | जिल्हा | महानगरपालिकाचे नाव | निधी वर्ग करण्यात आलेले कार्यालय | आदेश क्रमांक व दिनांक | रक्कम रु. अंकात | रक्कम रु.अक्षरात |
|---|---|---|---|---|---|---|
| **नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक:-मनपा-२०२५/प्र.क्र. १८५(१)/नवि-१६ (ई-१२७७९०६) दिनांक :-२४ नोव्हेंबर,२०२५ अन्वये निधी वितरण** | | | | | | |
| 1 | ठाणे | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका | जिल्हाधिकारी/जिल्हा प्रशासन अधिकारी,ठाणे | मनपा-२०२४/प्र.क्र.२२५(१७)/नवि-१६ (ई-८१८८५६) दि.२३.०९.२०२४ (शासन निर्णयाच्या परिशिष्टातील अ.क्र.९ व १० येथील कामांकरिता ) | 65,00,000.00 | रुपये पासष्ट लाख फक्त |
| **एकूण रक्कम रु.** | | | | | 65,00,000.00 | **रुपये पासष्ट लाख फक्त** |

वाचा मधील संदर्भ क्र.३ अन्वये शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील विहित केलेल्या कार्यपद्धती, सर्व अटी व शर्ती लागू राहतील. त्यांचे काटेकोरपणे पालन करून जिल्हाधिकारी / जिल्हा प्रशासन अधिकारी/जिल्हा सह आयुक्त यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा. तसेच वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संबधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्यात यावे व सदर उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत संचालानालायास सादर करण्यात यावी.सदर निधी खर्च करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची संबधित जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

सदर निधी खात्यात जमा झालेनंतर, ७ दिवसात निधी प्राप्त झाल्याची पोहोच संचालनालयास सादर करावी आपली पोहोच ७ दिवसाच्या आत प्राप्त न झाल्यास संचालनालयाच्या आदेशान्वये आपल्या कार्यालयास निधी प्राप्त झाला आहे असे ग्राह्य धरण्यात येईल.

मा. आयुक्त तथा संचालक, न.प.प्र.सं. यांच्या मान्यतेने.

(संजय काकडे )
सह आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई

प्रत-

१. अवर सचिव, नगरविकास विभाग -१६, मंत्रालय, मुंबई -३२.
२. संबधित जिल्हाधिकारी / जिल्हा प्रशासन अधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय.
३. संबधित आयुक्त, महानगरपालिका.